Exh. 10/C

कौ.ही.म.स. अर्ज नं. ०४/२०२६

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल,**

**यांचे कोर्टात...**

सौ. अश्वीनी सागर ठाकूर ..... अर्जदार

**विरूध्द**

श्री. सागर वसंत ठाकूर, वगैरे ..... वि.प.

**यातील वि.प. तर्फे अर्जदार यांचे मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे—**

१) अर्जदार यांनी दाखल केलेला मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असून त्यातील कथने वि.प. यांना मान्य व कबुल नाहीत.

२) अर्जदार यांचा मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (१) मधील अर्जदार नं. १ व वि.प. यांचे झाले विवाहाचे अनुषंगाने असला मजकुर वगळता संपुर्ण खोटा व चुकीचा आहे.

Order Seen JMFC, Kagal

४) अर्जदार यांचे मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (२) मधील मजकूर, “सदर लग्नानंतर ........................................... ते...... .................................... शारिरीक त्रास दिला.” हा संपुर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असुन यातील वि.प. यांना मान्य व कबुल नाही.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

५) अर्जदार यांचे मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (३) मधील मजकूर, "त्यानंतर मे. २०१७ ................................................ ते ............................................ गावी आले." हा संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन यातील वि.प. यांना मान्य व कबुल नाही.

६) अर्जदार यांचे मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (४) मधील मजकूर, "त्यानंतर अर्जदार हया ................................................ ते ............................................ रहावयास गेल्या." हा संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन यातील वि.प. यांना मान्य व कबुल नाही.

७) अर्जदार यांचे मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (५) मधील मजकूर, "यातील वि.प. हे ............................................ ते ..... ........................................ तक्रार दाखल केली." हा संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन यातील वि.प. यांना मान्य व कबुल नाही.?

८) अर्जदार यांचे मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (६) मधील मजकूर, "वि.प. नी अर्जदार नं. १ यांना .................................. ......... ते ........................................... देय लागत आहे." हा संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन यातील वि.प. यांना मान्य व कबुल नाही.

९) अर्जदार यांचे मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (७) मधील मजकूर, "यातील वि.प. यांनी ............................................ ते ............................................ भाग पडले आहे." हा संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन यातील वि.प. यांना मान्य व कबुल नाही.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

१७) अर्जदार यांनी मुळ अर्ज व अंतरिम पोटगी अर्जातील कलम (८) मधील नमुद केलेले कारण "  यातील वि.प. यांनी लग्न झालेपासून अर्जदार यांचा चारित्र्यावर संशय घेवुन शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे व अर्जदार यांना माहेरी पाठवुन दिलेपासून त्यांचे उधरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी अर्जास कारण घडले आहे." हे खोटे असून ते यातील वि.प. यांना मान्य अगर कबुल नाही.

९) अर्जदार यांचे अंतरिम पोटगी अर्जातील कलम (९) मधील मजकूर, "वि. प. यांनी .............................................. ते .......................... ................... ऐपत आहे." हा संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन यातील वि.प. यांना मान्य व कबुल नाही.

१८) अर्जदार यांचे मुळ अर्जातील कलम (११) व अंतरिम अर्जातील कलम (१०) मध्ये नमुद केलेल्या मागण्या मान्य करता येणार नाहीत. मुळातच वि.प. यांनी अर्जदार यांचा कधीही कोणत्याही प्रकारचा छळ केलेला नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या मागण्या मान्य करता येणार नाही.

१९) **<u>यातील अर्जदार व वि.प. यांचेबाबतची खरी वस्तुस्थिती खालीलप्रमाणे:—</u>**

अ) वि.प. अर्जदार यांचा विवाह दि. २५/०६/२०१६ इ. रोजी झालेला असून अर्जदार या वि.प. यांच्या पत्नी आहेत. अर्जदार सदर विवाहानंतर वि.प. यांचे घरी कुडू, ता. करवीर येथे आपले सासरी नांदणेस आल्या.

ब) अर्जदार यांचा स्वभाव मुलत: भांडखोर अशा स्वरूपाचा आहे, त्या वि. प. यांचेशी  वेगवेगळया  कारणाने भांडत होत्या. वि.प. हे नंदुरबार येथे

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

कामानिमीत्य गेले असताना त्या ठिकाणी सुध्दा अर्जदार हया वि.प. यांचेशी या—नात्या कारणाने भांडत होत्या. अर्जदार व वि.प. यांचे विवाहतून अर्जदार नं. २ प्रशांत हा मुलगा झालेला आहे. सदर बाळाचे जन्मावेळी सुध्दा मानपानाचे मुद्दावरून अर्जदार हया वि.प. यांचेशी वाद करत होत्या.

क) अर्जदार यांचे बाळंतपणासह येणारा सर्व खर्च यातील वि.प. यांनीच केला होता. अर्जदार यांनी माझे माहेरचे लोकांनी हा खर्च का करायचा असे बोलुन हा सर्व खर्च वि.प. यांना करणेस भाग पाडले होते. तसेच सदर मुलगा हा लकव्यासारख्या आजाराने ग्रस्त असताना त्याचे दवाखानेचा खर्च सुध्दा यातील वि.प. यांनीच केलेला होता व आहे.

ड) वि.प. हे आपले गावी म्हणजे कुडू, ता. करवीर येथे येत असताना दि. ०७/०६/२०२५ इ. रोजी अर्जदार यांनी आपला भाऊ विनायक दिनकर कांबळे, त्यांचा मित्र संतोष हळदनकर, रा. वाळवे खुर्द, ता. कागल, बहीण दिपाली कावणेकर, दाजी पांडुरंग कावणेकर, रा. कावणे यांना बोलवुन घेतले. सदर व्यक्तींनी वि.प. हे किनी टोल नाका या ठिकाणी आले असता वि.प. हे आपले सर्व साहीत्य घेवुन आलेली गाडी टॅम्पो नंबर एमएच ०९ एफ सी ४५८५ ही आडवुन बळजबरीने गाडीमध्ये घुसून कोल्हापूर शिवाजी विद्यापिठापर्यंत आले तदनंतर वि.प. यांना मारहाण करून सदर गाडीतून उतरून सदरचा टॅम्पो संसार उपयोगी साहीत्य कपाट, फॅन, कपडे, पुस्तके, तीन तोळे सोने, बॅक पासबुक व वि.प. यांची महत्वाची कागदपत्रे असलेली फाईल घेवुन निघुन या साहीत्यासह अर्जदार यांचे घरी घेवुन गेले. तदनंतर वि.प. यांनी अर्जदार यांना सदर साहीत्यासह वि.प. यांची महात्वाची कागदपत्रे असलेली फाईल देणेबाबत विचारला असता तुम्ही या मी तुम्हाला सर्व साहीत्य देते असे बोलुन कोल्हापूर येथे यावयास सांगितले.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

इ) वि.प. यांना अर्जदार यांनी साहीत्य दिले नाहीच परंतु साहीत्य देतो असे बोलुन अर्जदार यांचे वडील यांनी बिद्री कारखाना येथे जुन २०२२ मध्ये बोलवले त्यावेळी त्यांचेसोबत त्यांचे मित्र महादेव हासबे हे होते. त्यावेळी अर्जदार यांचे वडीलांनी वि.प. यांचेशी वाद घालुन आम्ही तुला साहीत्य देणार नाही तुला काय करायचे ते कर असे बोलुन मारहाण केली तसेच याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार केली तर तुला जिवंत सोडणार नाही. तसेच माझे मुलीला नांदावयास घेवुन गेला नाही तर तुला सोडणार नाही अशी धमकी दिली. यावरून अर्जदार हया वि.प. यांना कोणत्याही कारणाशिवाय त्रास देत होत्या हे सिध्द होते.

ई) तदनंतर वि.प. यांनी अर्जदार नं. १ यांचेशी संपर्क साधनेचा प्रयत्न केला त्याचप्रमाणे अर्जदार नं. २ याची खुशाली व तब्बेतीची विचारपुस करणेसाठी वारंवार फोन केले परंतू अर्जदार यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व शिवीगाळ करणेचा प्रयत्न केला. तदनंतर अर्जदार यांनी वि.प. यांचेविरूध्द फोनवरून शिवीगाळ केली अशी खोटी तक्रार देवुन मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल यांचे न्यायालयामध्ये स.क्रिं.के.नं. ११४/२०२३ ची केस दाखल केली असून ती अदयाप प्रलंबित आहे. यावरून अर्जदार नं. १ हया वि.प. यांना कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय नाहक त्रास देत असलेचे सिध्द होते. त्याचप्रमाणे वि.प. यांची महात्वाची कागदपत्रांची फाईल आणणेकरीता वि.प. हे अर्जदार यांचे घरी गेले असता वि.प. यांना सदर फाईल न देता आपमाणीत करून व मारहाण करून परत पाठवुन दिले यावरून त्यांना वि.प. यांचेकडून पोटगी मागणेचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार येत नाही.

उ) वि.प. यांचेकडे सध्या कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. वि.प. हे सुशिक्षीत असून त्यांचे चांगले शिक्षण झालेले आहे असे असताना वि.प.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

यांची शैक्षणीक सर्व कागदपत्रे ही अर्जदार नं. १ ही घेवुन गेलेली असलेने वि.प. यांना नोकरी शोधणे अडचणिचे झालेले आहे. त्यामुळे वि.प. यांना स्वत:चाच उदरनिर्वाह करणे जिकीरीचे झाले आहे. तसेच वि.प. यांचे वडील हे अर्धांगवायूचे आजाराने त्रस्थ असून वि.प. यांची वयस्कर आई ही देखील आजारी असते त्यामुळे यांचे औषधोपचार याची जबाबदारी ही वि.प. यांचेवर आहे. त्यामुळे अर्जदार म्हणतात तशी दाद वि.प. यांचेविरूध्द मागता येणार नाही, व ती मे. कोर्टसो यांना देता येणार नाही.

ऊ) अर्जदार यांचा वि.प. यांनी कोणेत्याही प्रकारचा छळ केलेला नसलेने तिला मासिक रक्कम रू. ५,०००/– घरभाडे व उपजिवीकेसाठी दरमहा रक्कम रू. १५,०००/– मागणेचा कोणताही अधिकार नाही. अर्जदार हीला अर्थिक, मानसिक व शारिरीक त्रास दिलेला नाही. त्यामुळे तिला नुकसान रक्कम रू. २,००,०००/– तसेच अर्जदार यांचे अर्जाचा खर्च रक्कम रू. १०,०००/– देणेचा प्रश्नच उद्भवत नाही. अर्जदार यांचे अर्जातील मजकूर व अर्जदार यांच्या मागण्या पहाता अर्जदार हीने वि.प. यांचेकडून पैसे उकळणेच्या दृष्टीकोनातून खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

प) अर्जदार याकामी प्रस्तुतचा खोटी केस दाखल करून प्रस्तुत वि.प. नाहक खर्चात पाडल्याने कॉम्पेंसेटरी कॉस्ट म्हणुन रक्कम रू. ५०,०००/– (रूपये पन्नास हजार फक्त) अर्जदार यांनी वि.प. यांना देणेबाबत याच कामी हुकूम व्हावा.

२०) **<u>सबब वि.प. तर्फे विनंती की,</u>**

अ) अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

ब) न्यायचे इतर योग्य ते सर्व आदेश याच कामी प्रस्तुत वि.प. वतीने व्हावेत.

ड) न्यायचे इतर योग्य त्या सर्व दादी याचकामी प्रस्तुत वि.प. मिळावेत.

इ) जरूरतर म्हणणे दुरूस्तीस परवानगी व मुभा असावी.

येणेप्रमाणे म्हणणे असे.

मे. जा. व्हावे.

कागल

ता. ०५/०५/२०२६.

**प्रतिज्ञा**

मी यातील वि.प. श्री. सागर वसंत ठाकूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील म्हणणेमधील लिहीला संपूर्ण मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता. ०५/०५/२०२६.

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## ॲफिडेव्हीट

मी यातील वि.प. श्री. सागर वसंत ठाकूर, व.व. ४१, धंदा– काही नाही, रा. कुर्डू, ता. करवीर, जि. कोल्हापूर शपथपुर्वक ॲफिडेव्हीट करतो की, वरील म्हणणेमधील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु।। कागल ता. ०५/०५/२०२६.

ॲफिडेव्हीट करणार यांना मी ओळखतो.

**ॲड. बी. ए. मसवेकर**

## प्रतिज्ञा

मी यातील वि.प. श्री. सागर वसंत ठाकूर, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील म्हणणेमधील व त्याखालील ॲफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु।। कागल ता. ०५/०५/२०२६.

Solemnly Affirmed before me by
Shri. Sagar Vasant Takur
Age 41 of Kurdu Karveer who is
identified by Shri. B.A. Masvekar Adv
............whom I know personally
Dated :- 6/5/26

Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.05.06 16:13:24 +0530